साप्ताहिक

# परळी परिसर

Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25

* परळी वैजनाथ * सोमवार, दि. २१ जुलै २०२५ * पाने-४ * २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

## सांस्कृतिक कार्य विभागातर्फे गणेश उत्सवात राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन

बीड, (जिमाका): पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धेत नोंदणीकृत संस्था किंवा परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे सहभागी होऊ शकतात. सदर स्पर्धेचा अर्ज पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबईच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या ऑनलाईन पोर्टलद्वारेच २० जुलै पासून २० ऑगस्ट २०२५ पर्यंत स्वीकारण्यात येणार आहेत.

अपूर्ण अर्ज रद्द ठरविण्यात येतील. ही स्पर्धा निःशुल्क असून सांस्कृतिक कार्यक्रम, सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन, संस्कृतीचे जतन व संवर्धन याकरिता राबविण्यात आलेले उपक्रम, गडकिल्ले यांचे जतन व संवर्धन, राष्ट्रीय व राज्य स्मारके, धार्मिक स्थळे यांविषयी जनजागृकता तसेच जतन व संवर्धन, विविध सामाजिक उपक्रम व कार्ये, पर्यावरणपूरक मूर्ती, पर्यावरणपूरक सजावट,ध्वनिप्रदूषण रहित वातावरण, गणेशभक्तासाठी केलेल्या सोयी सुविधा यांच्या आधारे केलेल्या कार्याचा गौरव व्हावा आणि असेच समाजाभिमुख उपक्रम अधिकाधिक घडावेत म्हणून प्रोत्साहनपर पुरस्कार देण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. याच निकषांच्या आधारे स्पर्धेचे परीक्षण केले जाईल. २७ ऑगस्ट पासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवात सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयांनी 'गठीत केलेली जिल्हास्तरीय समिती या स्पर्धेत सहभागी मंडळे किंवा संस्थांच्या उत्सवस्थळाला भेट देतील आणि जिल्हास्तरीय परीक्षण पूर्ण करतील. मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे आणि पुणे हे ४ जिल्हे प्रत्येकी ३ आणि हे ४ जिल्हे वगळता अन्य ३२ अशा प्रत्येक जिल्ह्यातून एक यानुसार एकूण ४४ शिफारसी राज्यस्तरीय परीक्षणासाठी स्वीकारल्या जातील. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी सर्वांनी आपापल्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. राज्यस्तरीय परीक्षणात प्रथम तीन विजेत्यांना अनुक्रमे ५ लाख, २.५ लाख आणि १ लाख 'रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. तसेच अन्य जिल्हास्तरीय प्रथम विजेत्यांना २५ हजार रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. या स्पर्धेत अधिकाधिक संख्येने सहभाग नोंदवण्याचे आवाहन सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले आहे. ***



**परळी वैजनाथ :- येथील वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या श्रावणमास उत्सवास येत्या शुक्रवार (दि.२५) पासून सुरवात होत आहे. महिनाभर चालणाऱ्या या उत्सवाची तयारी मंदिर परिसरात पूर्ण होत आली आहे. भाविकांच्या सोयीसाठी उत्तरघाटावरील पायऱ्यावर दर्शन व्यवस्था केली गेली आहे.**

## ज्येष्ठ पत्रकार विलास बडे यांचे व्याख्यान



परळी वैजनाथ, (बातमीदार):- पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त ज्येष्ठ पत्रकार विलास बडे यांचे येत्या रविवारी (ता.२७) येथे व्याख्यान होणार आहे.

शहरातील नटराज रंग मंदिरात सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम होणार आहे. ग्रामीण तरूणांचे भविष्य, समस्या, संधी, संघर्ष या विषयावर श्री बडे विचार मांडणार आहेत. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त 'भविष्याची दिशा, युवाशक्तीचा सन्मान' या उपक्रमांतर्गत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला परळी तालुक्यातील युवक, कार्यकर्ते, तरूणांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संयोजक माजी नगरसेवक प्रा.पवन मुंडे यांनी केले आहे. ***

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या परळी विधानसभा अध्यक्षपदी श्री देशमुख तर शहराध्यक्षपदी श्री धर्माधिकारी यांची निवड

बीड (बातमीदार):- राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या परळी विधानसभा अध्यक्षपदी धनंजय मुंडे यांचे विश्वासू गोविंदराव देशमुख यांची पुन्हा एकदा नियुक्ती करण्यात आली आहे. त्याचबरोबर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तालुकाध्यक्षपदी वैजनाथराव सोळंके व शहराध्यक्षपदी बाजीराव भैया धर्माधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत आज बीड येथे संपन्न झालेल्या पदाधिकारी संवाद मेळाव्याच्या दरम्यान सदर नियुक्तीची पत्रे खासदार सुनील तटकरे तसेच माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.





काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची कार्यकारिणी बरखास्त केल्यानंतर ही पदे रिक्त होती. दरम्यान आज प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे हे बीड जिल्हा दौऱ्यावर आले असता धनंजय मुंडे यांच्या टीम मधील त्यांचे विश्वासू गोविंदराव देशमुख यांच्यासह वैजनाथराव सोळंके व बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांची पुनर्नियुक्ती करण्यात आली असून याबद्दल धनंजय मुंडे यांनी संबंधितांचे अभिनंदन केले आहे.

यावेळी व्यासपीठावर माजी आमदार अमरसिंह पंडित, आमदार विजयसिंह पंडित, आमदार विक्रम काळे, महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष सौ रूपालीताई चाकणकर, ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे, सामाजिक न्याय विभागाचे प्रदेशाध्यक्ष सुनील मगरे, युवक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, माजी आमदार संजय भाऊ दौंड, माजी आमदार बाळासाहेब आजबे, जिल्हाध्यक्ष ॲड . राजेश्वर आबा चव्हाण, युवक नेते अजय मुंडे यांसह पदाधिकारी व आजी-माजी लोकप्रतिनिधी आदी उपस्थित होते.

## सेवा संकल्प सप्ताह: ना.अजितदादांचे अभिष्टचिंतन, विविध स्पर्धांचे बक्षिस वितरण, गुणवंतांचा गुणगौरव व शैक्षणिक व्याख्यानाचे आयोजन

### मोठ्या संख्येने उपस्थित रहा- श्री धर्माधिकारी यांचे आवाहन

परळी वैजनाथ, (बातमीदार):- उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार व आ.धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, परळी वैजनाथ आयोजित सेवा संकल्प सप्ताहात आज (२२ जुलै) राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या वाढदिवसा निमित्त अभिष्टचिंतन, विविध स्पर्धांचे बक्षिस वितरण, गुणवंतांचा गुणगौरव व शैक्षणिक मार्गदर्शन सोहळा होणार आहे. यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन वैजनाथ सोळंके व बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी केले आहे.

लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदीर, परळी वैजनाथ येथे आज २२ जुलै रोजी सकाळी १०:०० वाजता हा सोहळा सुरु होणार आहे. या सोहळ्यास उद्घाटक म्हणून अप्पर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई अश्विनी सोनवणे (जिरंगे) तर अध्यक्षस्थानी जि. प. गटनेते अजय मुंडे राहणार आहेत. याप्रसंगी शिक्षणतज्ञ व अभियांत्रिकी महाविद्यालय सल्लागार समिती, महाराष्ट्र





राज्य संचालक प्रा.महेश पाटील सर यांचे शैक्षणिक मार्गदर्शनपर व्याख्यान होणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून माध्यमिक विभाग, बीड शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील, प्राथमिक विभाग शिक्षणाधिकारी भगवान फुलारी, उपविभागीय अधिकारी परळी वैजनाथ अरविंद लाटकर, दिव्यांग कल्याण महामंडळ महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे, तहसिलदार परळी वैजनाथ व्यंकटेश मुंडे, न.प. मुख्याधिकारी तथा प्रशासक त्र्यंबक कांबळे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या सोहळ्यात सेवा संकल्प सप्ताहात घेण्यात आलेल्या योगासन स्पर्धा, मृदंग वादन स्पर्धा, महिला भजन स्पर्धा, शालेय सांस्कृतिक स्पर्धा महोत्सव शहर व ग्रामीण, सामान्य ज्ञान स्पर्धा, रील्स स्पर्धा या विविध स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात येणार आहेत.

तसेच गुणवंतांचा गुणगौरव सोहळा होणार आहे. तरी या सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी व सर्व पदाधिकारी राष्ट्रवादी काँग्रेस परळी वैजनाथ यांच्या वतीने करण्यात आले आहे. ***



परळी वैजनाथ :- येथील रेल्वे उड्डाणपुलाच्या दुरूस्तीचे काम १५ जुलैपासून सुरू झाले असून यामुळे या पुलावरून जड वहानांची वाहतूक बंद केली गेली आहे. दुचाकी वहाने व पायी जाणाऱ्यांनाच पुलावरून ये-जा करू दिले जात आहे. ५ ऑगस्टपर्यंत हे काम चालणार असल्याने वहानचालकांची गैरसोय होणार आहे.



बीड :- राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या परळी शहराध्यक्षपदी ज्येष्ठ नेते बाजीराव (भैय्या) धर्माधिकारी यांची फेरनिवड करण्यात आली. या निवडीचे पत्र बीड येथील एका कार्यक्रमात श्री धर्माधिकारी यांना देताना पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे, माजीमंत्री आ.धनंजय मुंडे, आ.विक्रम काळे, महिला आयोगाच्या प्रदेशाध्यक्षा रूपाली चाकणकर, आ.विजयसिंह पंडित आदी मान्यवर.

## खरय.. पण...



सरकार 'दारू'
इकून लोकांना
'गहू-तांदूळ' वाटतंय..!
अन्
लोकं 'गहू-तांदूळ'
इकून 'दारू'
घेताहेत..!

## हसरा कोपरा..!



इथे मोबाईला नीट नेटवर्क मिळत नाही रे! काय करू? सिमकार्ड बदलू की पक्ष?



# परळी तालुक्यातील ९० पैकी ४६ ग्रामपंचायती महिलांसाठी राखीव

परळी वैजनाथ, (जगदीश शिंदे):- परळी तालुक्यातील ९० पैकी ४६ ग्रामपंचायतीवर महिलाराज येणार असून नुकत्याच झालेल्या आरक्षण सोडतील ५० टक्के महिला आरक्षण लागू करण्यात आले आहे. यामुळे आगामी काळात होणाऱ्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत गावचा कारभारी कोण होणार? याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाच्या सोडत मंगळवारी तहसील कार्यालयात काढण्यात आली. ही सोडत उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांच्या उपस्थितीत काढण्यात आली. यात परळी तालुक्यातील ९० पैकी ४६ ग्रामपंचायती महिलासाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

**तालुक्यातील सरपंचपदाचे प्रवर्गनिहाय आरक्षण:-** अनुसूचित जाती (महिला) वाणटाकळी तांडा, सरफराजपूर, पाडोळी, रामेवाडी (का), ब्रम्हवाडी, नाथरा, वाघाळा (प), करेवाडी

**अनुसूचित जमाती (महिला) दाऊतपूर:-** नागरिकांचा मागास प्रवर्ग : कौडगाव हुडा, कौडगाव साबळा, कौठळी, लिंबुटा, सेलू, नंदनज, लेंढेवाडी, मैंदवाडी, कासारवाडी, वंजारवाडी, जयगाव, मलनाथपूर

नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) पिंपरी (बु), औरंगपूर, कौडगाव घोडा, इंजेगाव, सोनहिवरा, तळेगाव, लाडझरी, धर्मापुरी, भोजनकवाडी, गोवर्धन हिवरा, संगम

**सर्वसाधारण प्रवर्ग (महिला):-** तेलसमुख, बोरखेड, हिवरा गोवर्धन, सिरसाळा, गडदेवाडी, तडोळी, दौनापूर, मिरवट, चांदापूर, नंदागौळ, जळगव्हाण, भिलेगाव, वडखेल, अस्वलआंबा, भोपळा, मरळवाडी, हेळंब, दैठणाघाट, पिंपळगाव गाढे, पांगरी, नागपिंप्री, टोकवाडी, सारडगाव, मांडवा (प), मालेवाडी

सर्वसाधारण प्रवर्ग: पोहनेर, कावळ्याचीवाडी, बोधेगाव, वाका, पुरचुंडी, नागापूर, कन्हेरवाडी, ममदापूर, आचार्य टाकळी, रेवली, वाणटाकळी, लोणारवाडी, डाबी, लोणी, वडगाव (दा), खोडवा सावरगाव, हाळंब, नागदरा, तपोवन, माळहिवरा, मांडेखेल, वाघबेट, जिरेवाडी, गृट्टेवाडी.

***

# नंदिकेश्वर शिवाचार्य महाराजांचे वीरशैव समाजाच्या वतीने परळीत अभिष्टचिंतन



परळी वैजनाथ, (बातमीदार):- श्री १०८ नंदिकेश्वर शिवाचार्य महाराज, सोनपेठ यांच्या जन्मदिवसाच्या पावन अनुषंगाने परळी वैजनाथ वीरशैव समाजातर्फे श्री संत गुरुलिंग मठ संस्थान, बेलवाडी येथे महाराजांचा अभिष्टचिंतन करण्यात आले.

श्री १०८ नंदिकेश्वर शिवाचार्य महाराज जन्मदिवसाच्या निमित्ताने ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनासाठी परळी येथे रविवार, दि २० जुलै रोजी आले असता, परळी वैजनाथ वीरशैव लिंगायत समजातर्फे महाराजांचा मानाची वस्त्रे व पुष्पहार अर्पण करून त्यांचे अभिष्टचिंतन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र वीरशेव सभेचे तालुकाध्यक्ष महादेव इटके विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्याम बुद्रे वक्रेश्वर मंदिराची विश्वस्त दयानंद स्वामी उल्हास ओपळे दैनिक लोकमतचे पत्रकार संजय खाकरे माजी नगरसेवक रमेश चौंडे अनील अष्टेकर अश्विन मोगरकर विकास प्रतिष्ठानचे सहसचिव विकास हालगे मुद्रा लोन समिती सदस्य सुशील हरंगुळे सचिन स्वामी बंडू चौंडे लहू हालगे गणेश स्वामी आधीच महिला व भक्त यावेळेस उपस्थित होते. ***

# राजस्थानी गणेश मंडळच्या अध्यक्षपदी गोपाल सोनी, सचिवपदी तिलक चरखा यांची निवड



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) : आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर परळी येथील राजस्थानी गणेश मंडळाची नूतन कार्यकारिणी नुकतीच उत्साही वातावरणात जाहिर करण्यात आली. मंडळाच्या अध्यक्षपदी श्री. गोपाल बालकिशनजी सोनी तर सचिवपदी श्री. तिलक झुंबरलालजी चरखा यांची एकमुखाने निवड करण्यात आली.

ही बैठक मंडळाच्या कार्यालयात पार पडली. प्रारंभी मागील वर्षीच्या कार्याचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर नवीन पदाधिकाऱ्यांच्या निवडीचा प्रस्ताव मांडण्यात आला, जो उपस्थित सदस्यांनी एकमताने मंजूर केला.

गोपाल सोनी आणि तिलक चरखा हे दोघेही मंडळाच्या कार्यात गेल्या अनेक वर्षांपासून सक्रिय असून, त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक उपक्रम यशस्वीपणे पार पडले आहेत. त्यांच्या कार्यतत्परतेवर सदस्यांनी पूर्ण विश्वास व्यक्त करत त्यांच्या निवडीचे स्वागत केले. निवडीनंतर अध्यक्ष गोपाल सोनी म्हणाले, ''गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून समाज प्रबोधन व एकोप्याचा महत्त्वाचा माध्यम आहे. आगामी काळात मंडळाच्या वतीने अधिकाधिक समाजोपयोगी उपक्रम हाती घेतले जातील. सचिव तिलक चरखा यांनी सांगितले, मंडळाच्या परंपरा जपत नव्या विचारांना चालना देण्याचा आमचा प्रयत्न असेल. सर्वांच्या सहकार्याने उत्सव अधिक भव्य व लोकसहभागातून साजरा केला जाईल.

कार्यक्रमास मंडळाचे सर्व पदाधिकारी, ज्येष्ठ सदस्य, माजी अध्यक्ष, गणेशभक्त व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी नूतन कार्यकारिणीचे अभिनंदन करत भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. **

## संत नामदेव महाराज गाथा पारायणनिमित्त महाप्रसादाचे आयोजन

परळी वैजनाथ, (बातमीदार):- श्री संत शिरोमणी नामदेव महाराज समाधी सोहळ्या निमित्ताने दरवर्षी प्रमाणे श्री संत नामदेव महाराज कृष्णा नगर येथील मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह तथा श्री संत नामदेव महाराज गाथा पारायण होत असुन येत्या २२ जुलै रोजी समाप्ती होत असुन किर्तन, पालखी मिरवणूक व त्यानंतर सार्वजनिक महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे तरी सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे संयोजन समितीने सांगितले आहे. मंगळवार दि.२२ जुलै रोजी सकाळी १०ते १२ गिताभक्त हभप श्री संपत महाराज गिते गुरुजी यांचे किर्तन होईल, त्यानंतर सार्वजनिक महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. ***

## दरवळणारा सुगंध...



दु:ख हाच गुरू आहे,
सुखात माणूस हवेत उडतो...
पण दु:ख माणसाला विचार करायला शिकवते.
आयुष्याच्या प्रत्येक वळणावर कोणत्या परिस्थितीत, कसं जगावं आणि कसं वागावं याचं प्रशिक्षण आपल्याला...
आयुष्यभर दु:खाकडून मिळत असतं...!!

संपादकीय...

# प्रशासनाने लक्ष देण्याची गरज...!

*** सुविचार ***

**वेळ निघून गेल्यावर सुचलेला विचार व पिके जळून गेल्यावर पडलेला पाऊस याची किंमत सारखीच असते.**

देशभरातील बारा ज्योतिर्लिंगापैकी पाचवे ज्योतिर्लिंग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या परळी वैजनाथ येथील श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या श्रावणमास उत्सवास येत्या शुक्रवार (ता.२५) पासून सुरवात होत आहे. महाशिवरात्री, श्रावणमास, अधिकमास हे इथले मोठे उत्सव. महिनाभर चालणाऱ्या श्रावणमास उत्सवात येथे रोज हजारो भाविक येतात. श्रावणी सोमवारी तर शिवभक्तांचा जनसागर उसळतो. रेल्वे, बस या बरोबरच खासगी वहानांनी येणाऱ्या भाविकांची संख्याही मोठी असते. परगावाहतून येणाऱ्या शिवभक्तांची येथे गैरसोय होऊ नये, त्यांना इथे प्रसन्न वाटले पाहिजे, ते येथे रमले पाहिजेत, यासाठी शहराचा कारभार पहाणाऱ्या प्रशासनाने सदैव जागरूक राहणे गरजेचे आहे.

आपल्याकडे असलेल्या मोठ्या देवस्थानाच्या ठिकाणी तीथले प्रशासन जशी तयारी करतात. विविध उपक्रम राबवतात. येणाऱ्या भक्तांची गैरसोय होऊ नये म्हणून सतत जागरूक रहातात, काळजी घेतात, तसे आपल्याकडे दिसत नाही. श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाचा इथला कोणताही उत्सव असो आपले काही फारसे देणे घेणे नाही, जे काही करायचे ते देवस्थान संस्था करेल, असेच इथल्या प्रशासनाला वाटते. त्यामुळे विविध उत्सवप्रसंगी व एरव्हीही प्रशासन फारसे काही करताना दिसत नाही. त्यामुळे इथे येणाऱ्या भाविकांची गैरसोय होते असे दिसते.

परळी शहरातून श्री वैद्यनाथ मंदिराकडे जाणाऱ्या छोट्या-मोठ्या रस्त्यांची स्वच्छता चांगल्या प्रकारे झाली पाहिजे. या मार्गावरील अतिक्रमणे काढली गेली पाहिजेत, मार्गावर तासन्तास उभी रहाणारी वहाने इतर ठिकाणी हलवली पाहिजेत, मार्गावरील गटरांची नियमित स्वच्छता झाली पाहिजे. शिवाय रस्त्यावरील कचरा, कचऱ्याचे ढिग सतत उचलले गेले पाहिजेत. रस्त्यावर बांधकाम साहित्य अनेक दिवस पडून असते यामुळेही नागरिकांची गैरसोय होते. असे साहित्यही उचलण्यास संबंधितांना सुचना दिल्या गेल्या पाहिजेत. मार्गावर चौकात, गर्दीच्या ठिकाणी रिक्षे बेशिस्तपणे उभी रहातात, शिवाय छोटी मोठी वहाने उभी केली जातात. यामुळे रस्त्यावर गर्दी वाढून वहातुकीची कोंडी होते. परिणामी सर्वसामान्य नागरिक इतर वहानचालकांना मोठा नाहक त्रास सहन करावा लागतो. रस्त्यावर फिरून फळे, इतर खाद्य पदार्थ विकणारे तसेच विविध वस्तू गाड्यावर विकणारे आपले गाडे बऱ्याच वेळा रस्त्याच्या मधोमध उभे करतात किंवा थांबवतात. आपले गाडे रस्त्याच्या कडेला, एका बाजूला उभे करण्यापेक्षा ते मधोमध उभे केले म्हणजे विक्री जास्त होते अशी धारणा इथे अनेकांची झाली आहे. त्यामुळे रस्त्यावरील वहातुक कोंडीत भरच पडते.

आपल्या शहरात रिक्षांना मीटर नाहीत. त्यामुळे परगावाहून येणाऱ्या भाविकांकडून बरेच रिक्षा चालक जादा भाडे आकारतात. यामुळे त्यांची लूट होते. श्री वैद्यनाथ मंदिर परिसरात अलिकडे मोठी गर्दी होत आहे. यातून रस्त्यावर वहातूक कोंडी होऊन सर्वसामान्य नागरिकांसह भाविकांची गैरसोय होते. खरेतर मंदिर परिसरातील रस्त्यावरून जडवहानांच्या वहातुकीला पूर्णपणे बंदी घातली पाहिजे पण असे होत नाही. मंदिरा समोरील रस्त्यांवरून जड वहानांच्या वहातुकीमुळे वहातुकीच्या कोंडीची समस्या सतत निर्माण होते आहे. मंदिरासमोर वहाने मोठ्या प्रमाणात उभी केली जातात. यामुळेही अडचणीत वाढ होते. रस्त्यावर थांबणारे रिक्षे, मंदिर परिसरातील विविध विक्रेत्यांचे रस्त्यांवर वाढत जाणारे अतिक्रमणे यामुळे मंदिर आवारात अडचणी वाढत आहेत. मंदिर परिसरात पोलिस बंदोबस्त सतत असला पाहिजे. वहातूक व्यवस्था चांगली रहावी म्हणून वहातूक पोलिस असणेही गरजेचे आहे. परंतु असे होत नाही. याशिवाय मंदिर परिसरात स्वच्छताही चांगली असली पाहिजे. यामुळे भाविकांची गैरसोय होणार नाही ते प्रसन्न राहतील. इथल्या व्यवस्थेचा चांगला संदेश जाईल. परंतु याकडे म्हणावे तसे लक्ष दिले जात नाही. मोठ्या उत्सवाच्या काळात मुख्य रस्त्यावरील मांस, मटण विक्रीची दुकाने बंद ठेवली गेली पाहिजेत, अशा दुकांनामुळे भाविकांच्या भावना दुखावतात, परंतु अशा गोष्टीकडे कुणीही लक्ष घालत नाही. शहराच्या मुख्य रस्त्यावर चौकाच्या व गर्दीच्या ठिकाणी नेत्याचे निवडीचे, वाढदिवसेच तसेच एखाद्या दुकानाच्या संभारंभाचे मोठमोठे डिजीटल बॅनरल लावले जातात. यासाठी मोठे लावण्याची परळीत स्पर्धा सुरू झाली आहे. यामुळे शहराचे विद्रूपीकरण होत आहे. बॅनर लावण्याबाबत येथे कोणतीही नियम नाहीत की त्यासाठी शुल्क आकारला जात नाही.

एकुणच परळीत प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनाला येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून प्रशासनाने सदैव जागरूक राहून ठोस उपाययोजना केल्या पाहिजेत. यासाठी नागरिकांनीही प्रशासनाला सहकार्य केले पाहिजे. तेंव्हाच इथल्या गैरसोयी दूर होण्यास मदत होईल.***

# १२ किल्ले, युनेस्कोचा जागतिक दर्जा आणि छत्रपती शिवाजी महाराज

**छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ एका भूभागाचे राजा नव्हते; ते स्वाभिमानाचे, स्वराज्य संकल्पनेचे आणि आत्मविश्वासाचे अधिष्ठान होते. त्यांनी उभारलेली स्वराज्याची संकल्पना म्हणजे केवळ राजसत्तेचा नव्हे, तर लोकसत्तेचा आणि राष्ट्राच्या स्वाभिमानाचा उगम होता. त्यांच्या या ध्यासाचे, ध्येयाचे मूर्तिमंत स्वरूप म्हणजे त्यांनी उभारलेले किल्ले. आज याच किल्ल्यांपैकी १२ किल्ल्यांना युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत मानांकन मिळाले, ही गोष्ट केवळ अभिमानाची नव्हे, तर इतिहासातुन बोध घेऊन आजच्या पिढीला नवे भान, एक नवी दृष्टी देणारी आहे.**

महाराजांनी या किल्ल्यांचं महत्त्व साडेतीनशे वर्षांपूर्वीच ओळखलं होतं. त्यांना ठाऊक होतं की, भारताच्या भूप्रदेशातले डोंगर, खिंडी, घाट, सागरी किनारे, नद्यानाले हे सगळे जर गडदुर्गांच्या माध्यमातून सुरक्षित केले, तरच स्वराज्य टिकू शकतं. त्यामुळे त्यांनी गडदुर्गांची निवड ही केवळ भूगोलाच्या आधारावर केली नाही, तर त्या जागेचा सैन्यदृष्ट्या उपयोग, पाणीपुरवठा, खाद्यसाठा, स्थानिक रयतेशी सहज संपर्क, शत्रूच्या हालचालींवर नियंत्रण, व्यापार उदीम हे सगळं काटेकोरपणे पाहिलं.



शिवाजी महाराजांचा गडदुर्गांवरचा जिव्हाळा हा एका बापाने आपल्या मुलांवर ठेवलेल्या प्रेमासारखा होता. त्यांनी प्रत्येक किल्ल्यावर किल्लेदार, कचेऱ्या, जलसाठा, अन्नकोठार, दारुकोठार, गुप्त मार्ग, देवालयं आणि या सर्वांची सुरक्षा करणारे शूरवीर मावळे ठेवले. गडाचे सर्व दरवाजे, बुरुज, खिंडीतून जाणाऱ्या वाटा, रात्रीचे पहारे, शस्त्रसाठा या सगळ्यांमध्ये ते स्वतः जातीने लक्ष्य घालीत. कधी गडांवर काही दुरुस्तीची वेळ आली तर, त्वरित डागडुगीचे आदेश देत आणि होऊ घातलेला खर्च स्वतः मंजूर करत.

शिवाजी महाराजांनी किल्ल्यांकडे केवळ युद्धासाठीच्या रणनीतीचे ठिकाण म्हणून पाहिले नाही. तर ते त्यांच्या स्वराज्याच्या रक्षणाचे, प्रशासनाचे, संस्कृती, परंपरांच्या जोपासनांचे, लोककला, कला सादर करणाऱ्या कलाकारांचे आश्रयस्थान आणि

**लेखन**
**श्री अनिल नलावडे**

मावळ्यांच्या आत्मविश्वासाचे केंद्र होते. पंचक्रोशीतील सर्व खेडेगाव आणि त्या गावांमधील जनतेचे श्रद्धास्थान होते. सह्याद्रीच्या अंगाखांद्यावर कोरले गेलेले हे दुर्ग म्हणजे महाराजांच्या दूरदृष्टीची आणि त्यांच्या व्यवस्थापन कौशल्याची जिवंत उदाहरणे आहेत.

रायगड, साल्हेर, शिवनेरी, लोहगड, खांदेरी, राजगड, प्रतापगड, सुवर्णदुर्ग, पन्हाळा, जिंजी, विजयदुर्ग आणि सिंधुदुर्ग या १२ किल्ल्यांचे महत्त्व हे केवळ त्यांच्या स्थापत्य शास्त्रामुळे नव्हे, तर त्यांनी साक्षीदार म्हणून जे काही पाहिले, अनुभवले, घडवले त्यामध्ये आहे.

दुर्गदुर्गेश्वर रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. तेथून त्यांनी प्रशासन चालवलं. अष्टप्रधान मंडळाची निर्मिती केली. आदर्शवत न्यायदान पद्धतीचा श्रीगणेशा झाला. मराठी भाषेच्या संवर्धनाची सुरुवात झाली. एक दुर्ग म्हणजे राष्ट्रनिर्मितीच्या सर्वच अंगांचं एक विद्यापीठ होऊ शकतं हेच शिवाजी महाराजांनी साडेतीनशे वर्षांपूर्वी जगाला दाखवुन दिलं. प्रतापगडावर अफझलखान वधासारखा ऐतिहासिक निर्णायक क्षण घडला. सिंधुदुर्ग आणि विजयदुर्ग हे सागरी किल्ले म्हणजे त्यांच्या नौदलाच्या दूरदृष्टीचे मूर्त स्वरूप होते. कोकण आणि घाटमाथा यांना जोडणारे हे किल्ले म्हणजे त्या काळच्या 'सुरक्षा चौकटीचे' आधारस्तंभ होते. शिवाजी महाराजांना हे ठाऊक होते की, राज्य उभं करायचं असेल तर त्या भूमीला कवचसमान अशी किल्ल्यांची साखळी उभी करणे गरजेचं आहे. म्हणूनच त्यांनी ३५० हून अधिक किल्ल्यांचा विकास केला, अनेक जुन्या किल्ल्यांचं पुनर्निर्माण केलं आणि काही पूर्णपणे नव्याने उभारले.

या किल्ल्यांमध्ये केवळ भिंती नाहीत, त्या भिंतींमध्ये एक विचार बंदिस्त आहे. या किल्ल्यांमध्ये असलेल्या गुप्त दरवाज्यांपासून ते पाण्याच्या टाक्यांपर्यंत प्रत्येक गोष्ट ही त्यांच्या कल्पकतेची साक्ष आहे. सह्याद्रीच्या या दगडांमध्ये केवळ शस्त्रांची जुळवाजुळव नाही, तर त्या काळातील राजकीय कुटनीती, स्थानिक लोकांशी नातं, संरक्षण धोरणे, शूर योद्ध्यांची जडणघडण, दुर्जनांना शासन आणि नैसर्गिक पर्यावरणाशी सुसंगत स्थापत्य यांचंही अलौकिक दर्शन घडतं.

आज युनेस्कोने यापैकी १२ किल्ल्यांना जागतिक वारसा स्थळ म्हणून मानांकन दिलं आहे, यामागे केवळ त्यांचा ऐतिहासिक किंवा स्थापत्य दृष्टीकोनच नव्हता, तर एक सशक्त संस्कृतीचा वारसा, स्थानिक समुदायांचे योगदान, पर्यावरणपूरक रचना, आणि कालसुसंगत धोरणे यांचा संपूर्ण विचार होता. युनेस्कोचे निकष हे फक्त सौंदर्य, वास्तुकला किंवा जुना इतिहास एवढे मर्यादित नसतात. त्यात त्या स्थळाचा आजच्या जगावर होणारा परिणाम, स्थानिक संस्कृतीशी असलेलं नातं, आणि जागतिक मानवतेला मिळणारा संदेश या गोष्टी महत्त्वाच्या असतात. आणि सांगायला अभिमान वाटतो की छत्रपती शिवाजी महाराजांचे हे १२ किल्लेच नाहीत तर प्रत्येक किल्ला हा आजच्या आधुनिक काळातही काळाच्याही भरपूर पुढे जाऊन अखिल

(उर्वरित पान ३ वर)

'परळी परिसर' हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)

RNI No.-MAHMAR/2017/74640 Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25 (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) www.parliparisar.com

* वर्ष ०९ * अंक ११ * पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) सोमवार, दि. २१ जुलै २०२५ * किंमत : २ रू.

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी पालकांची भूमिका तेवढीच महत्वाची-बाळासाहेब देशमुख

## नवीन प्राथमिक शाळेत पालक सुसंवाद मेळावा उत्साहात संपन्न

परळी वैजनाथ, (बातमीदार):- आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थी यशस्वी होण्यासाठी शिक्षक, शाळा याबरोबरच पालकांचीही भूमिका तेवढीच महत्वाची आहे असे प्रतिपादन येथील माजी नगराध्यक्ष व न्यू हायस्कूल शालेय समितीचे ज्येष्ठ सदस्य बाळासाहेब देशमुख यांनी केले.

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या येथील उर्जानगर वसाहतीतील नवीन प्राथमिक शाळेत शनिवारी (दि.१९) आयोजित करण्यात आलेल्या पालक सुसंवाद मेळाव्यात श्री देशमुख बोलत होते.

शाळेच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास संस्थेचे सदस्य अजय सोळंके, न्यू हायस्कूलचे मुख्याध्यापक के.व्ही.मोरे, नवीन प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक डी.जी.शिंदे, पर्यवेक्षक उमेश देशमुख, एल.आय.वाकडे, पालक प्रतिनिधी प्रसेन्नजीत रोडे, हनुमंत गुट्टे, अश्विनी होनराव, रागिनी केंद्रे आदी मान्यवरांसह पालक, विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

श्री देशमुख म्हणाले, शिक्षण क्षेत्रात वाढत चाललेल्या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना मोठी कसरत करावी लागत



आहे. यात यशस्वी होण्यासाठी शाळा, शिक्षक प्रयत्न करतातच पालकांचीही साथ मिळाल्यास विद्यार्थ्यांना यश निश्चित मिळेल असा विश्वास श्री देशमुख यांनी व्यक्त केला. प्रास्ताविक उमेश देशमुख यांनी केले. शाळेतील सातवीच्या विद्यार्थीनींनी गायलेल्या स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरूवात झाली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी राहूल ताटे, शिवशंकर शिंगणे, प्राजक्ता खानापूरे, सारिका भोसले आदी शिक्षकांसह उपस्थित अनेक पालकांनीही आपले विचार मांडले. मुख्याध्यापक डी.जी.शिंदे यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, प्रगतीसाठी, गुणवत्ता वाढीसाठी शाळेत राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांची माहिती देवून या मेळाव्यात पालकांनी विद्यार्थी व शाळेच्या प्रगतीसाठी केलेल्या सूचनांची दखल घेण्याचे आश्वासन देऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण प्रगतीसाठी पालकानी शाळेस सहकार्य करावे असे आवाहन केले. सुत्रसंचालन विनोद वाघमारे यांनी तर आभार प्रदर्शन सारीका मलशेटवार यांनी केले. हा पालक मेळावा यशस्वी करण्यासाठी डी.पी.श्रीरामे, नागेंद्र जाधव, श्री घोलप, श्रीमती साकसमुद्रे मॅडम, श्रीमती अघाव मॅडम यांच्यासह श्री चांगिरे, हरी मुंडे, अभिजीत डिकले आदींनी परिश्रम घेतले. ***

# जिद्द, परिश्रमातून जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करा : जिल्हाधिकारी

बीड (जिमाका) : स्पर्धा परीक्षेचा प्रवास व्यक्तिमत्त्व विकासाचा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. तरूणांच्या ध्येयपूर्तीसाठी स्पर्धा परीक्षेसाठीचे मार्गदर्शन निश्चित जिल्हा प्रशासनाकडून करण्यात येईल. तरी देखील प्रत्येकाने स्पर्धा परीक्षेत, यासह जीवनात यश संपादन करण्यासाठी स्वत:चे स्पष्ट ध्येय ठेवावे. जिद्द व परिश्रमातून आपल्या कुटुंबीयांसह जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी तरूणांना केले.

स्पर्धा परीक्षा तयारीत विद्यार्थ्यांना दर्जेदार मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने जिल्हाधिकारी जॉन्सन यांच्या संकल्पनेतून बीड जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवारी (ता.१४) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिराचे उद्घाटन झाले. या उपक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिरात परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक श्रीमती पूजा पवार आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून निवड झालेले उपप्रादेशिक परिवहन अधिकारी श्रीकृष्णकुमार बाहेती यांनी मार्गदर्शन केले. यावेळी अपर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक, नायब तहसीलदार प्रशांत जाधवर, राजेश सुपेकर, महादेव चौरे, दादासाहेब शेळके आदी उपस्थित होते.

श्रीमती पवार यांनी स्वानुभवातून विद्यार्थ्यांना प्रेरित केले. स्वप्नांचा पाठपुरावा, नैतिक मूल्यांची जाणीव आणि अभ्यासातील शिस्त या विषयांवर मार्गदर्शन केले. यशाचा प्रवास, अडचणींवर मात करण्याचे तंत्र, अभ्यासाचे नियोजन, वेळ व्यवस्थापन, परीक्षा तयारीतील सकारात्मक आणि नकारात्मक टप्पे याबाबत श्री. बाहेती यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी नैतिक मुल्ये, कौटुंबिक आणि सामाजिक समतोल याबाबतही विचार मांडले.

कार्यक्रमातील संवाद सत्रात विद्यार्थ्यांनी विचारलेल्या शंकांचे निरसन जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी, पोलिस उपअधीक्षक आणि उपप्रादेशिक अधिकारी यांनी केले. अपर जिल्हाधिकारी धार्मिक यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन ग्राम महसूल अधिकारी काजल ससाणे आणि शरद घोडके यांनी केले. आभार जाधवर यांनी मानले. ***

**सा.परळी परिसर चे वार्षिक वर्गणीदार व्हा!**
संपर्क :- मो.९४२२३२८४९३

# परळी तालुक्यातील कोणती गावे कोणत्या जि.प.गटात व पं.स. गणात?

## परळी तालुक्यात असे असणार सहा जि.प.गट व बारा पं.स.गण

परळी वैजनाथ, (बातमीदार):- आगामी काळात होणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीची प्रशासकीय पातळीवर तयारी सध्या सुरू असून बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषद गट व पंचायत समितीच्या गणांचे प्रारूप प्रशासनाने तयार केले आहे. या अनुषंगाने परळी तालुक्यात सहा जिल्हा परिषद गट व १२ पंचायत समिती गणांचे प्रारूपही तयार झाले आहे.

जिल्हा परिषदेच्या सहा गटांमध्ये व पंचायत समितीच्या बारा गणांमध्ये कोणकोणत्या गावांचा समावेश करण्यात आलेला आहे याची माहिती प्रशासनाने अधिसूचनेद्वारे दिली आहे. परळी तालुक्यात आपापली गावे कोणत्या जिल्हा परिषद गटात समाविष्ट झाली आहेत हे यातून आता स्पष्ट झाले आहे.

जिल्हा परिषद गटांची प्रारूप रचना करताना काही जि.प.गटांची नावे बदललेली आहेत. बाकी पुर्वीप्रमाणेच म्हणजेच सहा जि.प.गटांची रचना परळी वैजनाथ तालुक्यात असणार आहे.

**कोणती गावे कोणत्या जि.प.गटात व पं.स. गणात?**

**१. सिरसाळा जि.प.गट :- * पोहनेर गण :** डिग्रस, बोरखेड, तेलसमुख, रामेवाडी/कासारवाडी, जळगव्हाण,हिवरा गो., जयगांव, गोवर्धन (हि), हसनाबाद/पाडोळी. *** सिरसाळा गण:** तपोवन, सिरसाळा, वाका, भिलेगांव, खामगांव.

**२.पिंप्री (बु.) जि.प.गट :- पिंप्री (बु.) गण :** पिंप्री (बु.) ममदापुर, कौडगांव हुडा, श्रीकृष्ण नगर, श्रीराम नगर, कौडगांव घोडा, टाकळी आचार्य, पिंपळगांव गाढे.

**पांगरी पं.स.गण:** कौडगांव साबळा, कानडी, नाथ्रा, इंजेगांव टाकळी देशमुख, पांगरी/पांगरी तांडा/पांगरी कॅम्प, सेलू , सबदराबाद, मलनाथपुर, मलनाथपुर नविन वस्ती, रेवली/रेवली तांडा/ डांबतांडा,वडखेल/वडखेलतांडा, परचुंडी, लिंबोटा/लिंबोटा तांडा.

**३.मांडवा जि.प.गट :- बेलंबा गण:** कौठळी,कौठळी तांडा, बेलंबा/बेलंबा तांडा, वडगाव दा.,दगडवाडी, कासरवाडी, वैजवाडी.

**मांडवा गण :** वसंत नगर, धारावती तांडा, मलकापूर, मिरवट, नंदनज, मरळवाडी, मांडवा(प.), सारडगाव, मालेवाडी/मालेवाडी तांडा/ वनवासवाडी.

**४.नागापूर जि.प.गट :- नागापूर गण :** नागापूर, बहादूरवाडी, डाबी, डाबी तांडा, अस्वलांबा/नामानाईक तांडा/ नारायण कौलतांडा, मांडेखेल, वाणटाकळी, वाणटाकळी तांडा, दौनापूर, सोनहिवरा **मोहा गण:** वाघाळा, नागपिंपरी, कावळ्याची वाडी, मोहा, वंजारवाडी, करेवाडी, सरफराजपूर, गडदेवाडी/कामठतांडा/माधवतांडा बोधेगांव / चोपनतांडा, बोधेगांव, माळहिवरा, गोपाळपूर, तडोळी

**५. जिरेवाडी जि.प.गट :- टोकवाडी गण:** तळेगाव, टोकवाडी, वाघबेट, संगम, दाउतपूर,जुनी थर्मल कॉलनी, ब्रह्मवाडी, इंदपवाडी/इंदपवाडी तांडा.

**जिरेवाडी गण:** जिरेवाडी, जलालपुर, परळी ग्रामीण (प्रियानगर, शंकर पार्वती नगर, बजरंग नगर, बँक कॉलनी),भोपला, देव्हाडा, कनेरवाडी/ जांभुळवाडा तांड/ गांधी तांडा, लेंडेवाडी, इंदिरानगर, मैंदवाडी/ रुपसिंग तांडा/ सेवानगर तांडा,दौंडवाडी

**६.धर्मापुरी जि.प.गट:- नंदागौळ गण:** नागदरा, आनंदवाडी, लाडझरी, चांदापूर/ चांदापूर नविन वस्ती, नंदागौळ, परळी ग्रामीण (मलिकपुरा, वडसावित्रीनगर )

**धर्मापुरी गण:** धर्मापुरी, भोजनकवाडी, खोडवा सावरगाव, हेळंब, हाळम, दैठणाघाट, गुट्टेवाडी. ***

(पान २ वरुन)...

## १२ किल्ले, युनेस्कोचा जागतिक दर्जा आणि छत्रपती शिवाजी महाराज

विश्वाला नवनिर्मितीचा एक महान संदेश देऊ शकतो एवढी ताकद यामध्ये आहे. आमच्या रिसर्च करणाऱ्या आजच्या मुलांनी यावर विशेष संशोधन करायला हवे.

शिवकालीन किल्ले हे त्या सगळ्या निकषांवर उत्तीर्ण होतात. कारण ते आजही मराठा आत्म्याचे प्रतीक आहेत. केवळ पर्यटकांसाठीच्या स्थळांप्रमाणे न पाहता, या किल्ल्यांनी समाजात एक अभिमान आणि प्रेरणा जागवली आहे. शिवाजी महाराजांनी किल्ले म्हणजे युद्धाचे फक्त साधन म्हणून नाही, तर राष्ट्र उभारणीचे तंत्रज्ञान म्हणून वापरले. त्यामुळे या किल्ल्यांना जागतिक वारसा स्थान म्हणून मान्यता मिळणं ही भारतासाठी केवळ एक सन्मान नव्हे, तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांना, तत्त्वज्ञानाला आणि दूरदृष्टीला आंतरराष्ट्रीय पातळीवर मिळालेली जगतमान्यता आहे.

**या मानांकना मुळे काय होणार आहे?**

सर्वप्रथम, हे मानांकन या किल्ल्यांचे जागतिक महत्त्व अधिक अधोरेखित करेल. जागतिक पर्यटकांच्या दृष्टीने हे स्थळे आकर्षण ठरतील, त्यात पर्यटनवाढीची संधी निर्माण होईल, स्थानिक अर्थव्यवस्था बळकट होईल, आणि महत्त्वाचं म्हणजे या किल्ल्यांच्या संवर्धनासाठी अधिक निधी व संशोधनाची दारे उघडतील. या निमित्ताने जागतिक पातळीवर अनेक इतिहासक, अभ्यासक, संशोधक, तत्वज्ञ, विचारवंत, विध्यार्थी या सगळ्यांचाच शिवरायांच्या अनेक पैलूंवर अभ्यास सुरु होईल. युनेस्कोचा दर्जा मिळाल्यामुळे भविष्यात आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्थापत्यतज्ज्ञ, पर्यावरण अभ्यासक, आणि पुरातत्वशास्त्रज्ञ इथे आकर्षित होतील, ज्यातून शिवकालीन वास्तुशास्त्र आणि युद्धनीतीवर नव्या उंचीची चर्चा होऊ शकेल. भारत सरकार, महाराष्ट्र शासन आणि स्थानिक समुदाय यांच्या एकत्रित प्रयत्नातून आता या किल्ल्यांचं संवर्धन अधिक वैज्ञानिक आणि टिकाऊ पद्धतीने होऊ शकणार आहे.

या सगळ्या प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे जगाचा आपल्या या सुवर्णमयी इतिहासाकडे पाहण्याचा दृष्टिकोन आता बदलतो आहे. या किल्ल्यांच्या दगडांमध्ये आपले पूर्वज, आपले स्वातंत्र्यसैनिक, आपले वीर मावळे अजूनही बोलत आहेत. त्यांचे आवाज आज जगभर पोहोचू लागले आहेत. युनेस्कोने केवळ १२ किल्ल्यांना मानांकन दिले नसून, शिवरायांच्या थेट संकल्पनेलाच मान्यता दिली आहे.

सरते शेवटी, आपल्याला हे लक्षात घेतलं पाहिजे की, कोणत्याही किल्ल्याची खरी ताकद त्याच्या उंच भिंतींत नसते, ती असते त्यामागच्या ध्यासात, त्या ध्येयवादी राजाच्या दृष्टिकोनात, आणि त्याच्यासाठी प्राण अर्पण करणाऱ्या मावळ्यांच्या शौर्यात. आज हे किल्ले पुन्हा एकदा जागतिक पातळीवर त्याच तेजात उजळून निघत आहेत, आणि आपल्याला सांगत आहेत. स्वराज्य हे केवळ स्वप्न नव्हे, ती एक जळती मशाल आहे, जी पिढ्यानपिढ्या पेटवत ठेवावी लागते.

आज हा छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा जो त्यांनी साडेतीनशे वर्षांपूर्वी जीवा पलीकडे जपला होता, तोच वारसा आता महाराष्ट्रापुरता किंवा भारतापुरता मर्यादित न राहता जागतिक दर्जाचा वारसा म्हणून घोषित झालेला आहे. अशावेळी आपण या देशीचे सुजाण नागरिक म्हणून या गडदुर्गांचे मनापासून संवर्धन करण्यासाठी, त्याबद्दलच्या काटेकोर नियमांचे मनापासून पालन व्हायला हवे यासाठी कटिबद्ध होणे फार महत्त्वाचे आहे. वेळेअभावी आपण संवर्धन करू शकलो नाही तरी आज महाराष्ट्रात संवर्धन करणाऱ्या अनेक संस्था कार्यरत आहेत. अगदी मनापासून आपलं घरदार नोकरी उद्योग सगळं सांभाळीत या दुर्गसंवर्धन संस्था या गड दुर्गांचं गेली अनेक वर्ष संवर्धन करीत आहेत. आपण अशा दुर्गसंवर्धन संस्थांना काही प्रमाणात देणगी देऊन, काही मदत देऊन किंवा जेव्हा जमेल तेव्हा व्यक्तिश: यांच्या दुर्गसंवर्धनाच्या मोहिमेमध्ये सामील होऊन यासाठी आपलं योगदान देऊ शकतो. याचा जरूर तो विचार व्हावा.

छत्रपती शिवाजी महाराजांनी पेटवलेली ही मशाल आज सह्याद्रीच्या भव्य माथ्यावरून, त्या किल्ल्यांच्या, गडदुर्गांच्या शिखरांवरून पुन्हा एकदा जागतिक नकाशावर झळकते आहे तेजस्वी, भव्य आणि प्रेरणादायी! सदैव स्फूर्ती देत राहणारी. ***